Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ५०] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १६-२२, २०२१/अग्रहायण २५-पौष १, शके १९४३ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-२
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	२-८
भाग एक-अ.–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१-२

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. १०२३.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Date 25th November 2021.

I

No. SPP-1320-560-C.R.51-D-XIV :- In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby cancels the appointment of Adv. Ajay K. Patil, Amravati as “Special Public Prosecutor” for conducting the Criminal Case No. 544/11 pending at Judicial Magistrate, First Class, Amravati made *vide* Government Notification No. SPR-2011-680(204)-XIV, Dated 10th October, 2011 with immediate effect.

II

No. SPP-1320-560-C.R.51-D-XIV :- In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby appoints Adv. Shirish J. Jakhad, Amravati as “Special Public Prosecutor” for conducting the Criminal Case No. 544/11 before the Judicial Magistrate First Class, Amravati and Criminal Revision No. 04/2013 pending before Sessions Court, Amravati. Which is arising out of C.R. No. M-1/2011, registered at Gadgenagar Police Station, Dist. Amravati.

2. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

3. Lump sum fees of Rs. 40,000/- (Rupees Forty Thousand only) as quoted by Adv. Shirish J. Jakhad has been already deposited by the applicant Shri Nitin Dhande with the Government, *vide* R.B.I. Challan No. 5092, dated 16-11-2021. The amount will be paid to Adv. Shirish J. Jakhad after completion of the case.

4. The Government reserves the right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI P. BORUDE,
Section Officer.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. १०२४.

जिल्हाधिकारी, यांजकडून

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक प्र.अ.-भू.सं.-अ.का.-कावि-७९५-२०२१. —

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त जमीन ” असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त सार्वजनिक प्रयोजन ” असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचिमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष पिरिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश “ उक्त नियम ” असा करण्यात आला आहे) यांच्या

नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक २, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १५-४७-२०१९-२०२०,
मौजा राजुरा, तालुका चांदूर बाजार, जिल्हा अमरावती.

अ. क्र. (१)	सर्व्हे नं. /गट नं. (२)	अंदाजित क्षेत्र (३) हे. आर
१	२९/१/अ	० ८१
२	३०/१ पैकी	१ ००
३	६८ पैकी	१ ०१
४	६८ पैकी	० ३६
५	६८ पैकी	० ९३
६	६८ पैकी	१ ८६
७	७३/१/ब पैकी	० ०२
८	७३/१ पैकी	० ११
९	७३/१ पैकी	० ०६
१०	७४/१ पैकी	० १७
११	७४/१/ब	१ ००
१२	७४/१/ड	० ९३
१३	७४/२	१ ५८
१४	७४/३	२ ०२
१५	७४/३	० ४०
१६	७४/४	० ८२
१७	७४/४/अ	१ ६२
१८	७४/४/अ	० ८१
१९	७६/१	१ ०५
२०	७६/२	० ५६
२१	७६/२/अ	० २६
२२	७६/३	१ ७५
२३	७६/४	० ५४
२४	७६/४/अ	० ४५
२५	७६/५	० ४६
२६	७६/६	० १४
	एकूण . .	२० ७२

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन : राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याकरीता.

समाजाला मिळणारे लाभ : राजुरा बृहत लघु प्रकल्प (धरण बैठक व पुच्छ कालवा) कालव्याच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धानामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश : (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचना अन्वये सूट देण्यात आली आहे. सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची आवश्यकता नाही.)

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक

टीप.—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक २, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

पवनीत कौर,

अमरावती :
दिनांक २५ नोव्हेंबर २०२१.

जिल्हाधिकारी,
अमरावती.

भाग १ (अ. वि. पु), म. शा. रा., अ, क्र. १०२५.

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक प्र.अ.-भू.सं.-रप्र.-कली-कावि-७४१-२०२१. —

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक

प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे,

आणि, ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता, असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीची अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रस्ते प्रकल्प, यवतमाळ, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-४७-२०२०-२०२१,
गाव नबाबपूर, तालुका नेर, जिल्हा यवतमाळ.

अ. क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित अंदाजित क्षेत्र
(१)	(२)	(३)
		चौ. मि.
१	२३२/पै/१६	४.५०
२	२३२/पै/१७	२५६.४५
३	२३२/पै/१८	२४९.६८
४	२३२/पै/१९	१७३.८६
५	२३२/पै/२०	१७४.००
६	२३२/पै/२१	१७४.००
७	२३२/पै/२२	१६८.१६
८	२३२/पै/२३	१५८.४९
९	२३२/पै/२४	१७४.००
१०	२३२/पै/२५	१७४.००
११	२३२/पै/२६	१९१.८६
	एकूण . .	१८९९.००

अ.-एक-२ (१६९०).

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव	:	नेर वळण रस्त्याचे बांधकामाकरीता.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:	नेर वळण रस्त्याचे बांधकामाकरीता सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ
समाजाला मिळणारे लाभ	:	सार्वजनिक हितार्थ

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) : दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकिर्ण ०१-२०१५-प्र.क्र.३-अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०(क) नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम	:	प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.
(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता	:	निरंक
(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील	:	निरंक

टीप.—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अमोल येडगे,
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक २५ नोव्हेंबर २०२१.

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. १०२६.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

क्रमांक उपवि-अका-भूसंपादन-कावि-५२६-२०२१. —

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती, रस्ता बांधकाम प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी

वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक अ.का.-प्र.अ.-भूसंपादन-का.वि.-४२४-२०१८, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती दिनांक ५-५-२०१८ अन्वये उक्त शासन निर्णय, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता.

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी, इब्राहिम एम. चौधरी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे याद्वारे,

(एक) अनुसूची-एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे ;

आणि

(दोन) रस्त्याच्या कामाकरीता जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरिय समितीमार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परीगणतीत होणा-या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नांवे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरीत्या स्विकारण्यात तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवीत आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे/कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच, सदर नमुना या कार्यालयामार्फत/विशेष प्रकल्प विभागाच्या प्राधिकृत अधिका-यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे यांच्या कार्यालयामध्ये/कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, अमरावती या प्राधिकृत अधिका-यांच्या कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

अनुसूची - एक

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीचा तपशील

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक ५९-४७-२०१७-२०१८,

गाव जावरा मोळवण, तालुका नांदगाव (खं.), जिल्हा अमरावती

अ. क्र.	गट क्रमांक सर्व्हे क्रमांक	भूधारणा पद्धती	गाव नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र	खरेदी करावयाचे क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
			हे. आर	हे. आर
१	२/१	भो-वर्ग-१	१ ४१	० ०५
२	३/१	भो-वर्ग-१	० ६८	० ०१
३	३/२	भो-वर्ग-१	० ६९	० १२

अनुसूची - एक—चालू

(१)	(२)	(३)	(४) हे. आर	(५) हे. आर
४	७२/२ अ	भो-वर्ग-१	० ४१	० ०७
५	७२/२	भो-वर्ग-१	० ६५	० ०८
६	७२/२ क	भो-वर्ग-१	० ६५	० ०८
७	७२/२ ब	भो-वर्ग-१	० ६४	० ०७
८	७२/१ ब	भो-वर्ग-१	१ ४१	० १२
९	७२/१ अ पैकी	भो-वर्ग-१	० ७१	० ०४
१०	७२/१ अ पैकी	भो-वर्ग-१	० ७०	० ०५
११	७२/१	भो-वर्ग-१	१ १३	० ०७
१२	७३/२ पैकी	भो-वर्ग-१	२ ३१	० १३
१३	७३/२ पैकी	भो-वर्ग-१	० ८३	० ०४
१४	७३/१	भो-वर्ग-१	४ १०	० ३१
१५	७४/४	भो-वर्ग-१	० ०६	० ०१
१६	७४/३ पैकी	भो-वर्ग-१	० २२	० ०२
१७	७४/३ पैकी	भो-वर्ग-१	० ९२	० ११
१८	७४/३ पैकी	भो-वर्ग-१	१ ८८	० ४२
१९	७५/१	भो-वर्ग-१	१ १७	० ०१
२०	७५/२ पैकी	भो-वर्ग-१	० ६७	० ०४
२१	७५/३	भो-वर्ग-१	१ १६	० ०५
२२	७६/२	भो-वर्ग-१	२ २६	० २४
		एकूण . .	२४ ६६	२ १४

इब्राहिम एम. चौधरी,

उपविभागीय अधिकारी तथा

भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे.

चांदूर रेल्वे :

दिनांक २६ नोव्हेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.